**महाराष्ट्र शासन**
**निरीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,डहाणु जि.पालघर यांचे कार्यालय**
**मु.चारोटीनाका,महामार्ग पोलीस चौकीच्या बाजुला ता.डहाणू जि.पालघर**
**EmailId:Ipexcisedahanu@gmail.com**

क्रमांक :- ग्रा.द.११२०२५ / ५४६ / निरी डहाणू    दि.१५/०७/२०२५

प्रती,
मा.गट विकास अधिकारी,
पंचायत समिती ,डहाणू
ता.डहाणू जि.पालघर

विषयः- ग्रामरक्षक दलांची स्थापना करणे व अवैध दारुस प्रतिबंध घालण्यासाठी तालुकास्तरीय समितीची स्थापना करुन ग्रामरक्षक दलाच्या तक्रारींचा आढावा घेणेबाबत.

संदर्भ :- मा.अधीक्षक,राज्य उत्पादन शुल्क,पालघर यांचे ज्ञापन क्रमांक इएसटी ११२०१८/ ७९७/अधी / १५०३ पालघर १४ जुलै २०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणास सविनय कळविण्यात येते कि, शासन पत्र क्र. बीपीए ०५१७/प्र.क्र.१५९(२)/ राऊश-३ दि.०९ जानेवारी २०१८ च्या पत्रान्वये ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याच्या अनुषंगाणे शासन अधिसुचना दिनांक २२ मार्च २०१७ मध्ये विहित केलेल्या तरतुदी नुसार आदेशित केले आहे. या बाबत आपल्या कार्यालयास या कार्यालयाचे पत्र क्रमांक ग्रा.द. ११२०१८/५९ / निरी डहाणू दि.२९/०१/२०१९ नुसार अवगत करण्यात आलेले आहे. सोबत पत्राची छायांकित प्रत जोडत आहे.

तरी आपणास कळविण्यात येते कि, आपल्या अंतर्गत येत असलेल्या सर्व ग्रामपंचायतींनी ग्रामरक्षक दलाची स्थापना केली किंवा कसे ? तसेच मा.आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक बीपीए ११२०१६/१५१९/नऊ दिनांक ३०.६.२०२५ नुसार ग्रामरक्षक दलांची स्थापना करणे व अवैध दारुस प्रतिबंध घालण्यासाठी तालुकास्तरीय समितीची स्थापना करुन ग्रामरक्षक दलाच्या तक्रारींचा आढावा घेणेबाबत निर्देशित केले आहे.त्या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील ग्रामपंचायतींना ग्रामरक्षक दलाची स्थापना करण्याचे सुचित करण्यात यावे हि विनंती.

आपल्या माहितीस्तव व पुढील कार्यवाहीकरीता सविनय सादर.

आपला विश्वासु

( सुनिल देशमुख )
निरीक्षक,
राज्य उत्पादन शुल्क,
डहाणू विभाग जि.पालघर

पंचायत समिती डहाणू
दिनांक 16/07/2025
आवक :- 3778
विभाग :-

सही. प्रशा. अधि. | सही. ग.वि.अ. | ग.वि.अ. (उ.श्रे.)

श्री: म्हाले . कपुऊ
सर्व ग्रा.प.-ना पत्र देणेत यावे.
16/07/25

93